महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ५४ वे | दिनांक : १४/०२/२०२६ | वार : शनिवार

## राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणाला जुन्नरमधून सुरुवात : दोन्ही पक्षांची हातमिळवणी



**मुंबई :** राज्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांना वेग आला असताना पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात या चर्चेची पहिली ठोस झलक दिसली आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर दोन्ही गटांनी एकत्र काम करावे, अशी भावना अनेक नेत्यांकडून व्यक्त होत आहे. अजित पवार यांनाही दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्यात असे वाटत होते, अशी माहिती काही पदाधिकाऱ्यांनी दिली. या पार्श्वभूमीवर जुन्नरमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत दोन्ही बाजू एकत्र आल्याचे चित्र दिसले.

माजी आमदार अतुल बेनके यांनी सांगितले की, मी आणि खासदार अमोल कोल्हे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक एकत्र लढवली. पुढे राज्यात काय होईल, हे माहीत नाही; मात्र जुन्नरमध्ये आम्ही दोन्ही राष्ट्रवादी एकत्र राहून काम करणार, असा निर्णय तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्यांच्या या विधानामुळे स्थानिक पातळीवर संयुक्त वाटचालीला औपचारिक स्वरूप मिळाल्याची चर्चा सुरू झाली.

दरम्यान, उपमुख्यमंत्री झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी पहिली बैठक पुण्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत विजयी झालेल्या उमेदवारांसोबत घेतली. या बैठकीत त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून काम करण्याचे आवाहन केले आणि अजित पवार यांच्या कामाचा वारसा पुढे नेण्याची गरज अधोरेखित केली. याच वेळी जुन्नर तालुक्यातील दोन्ही राष्ट्रवादींचे पदाधिकारी त्यांना भेटले. या भेटीत स्थानिक पातळीवरील एकत्रित कामाच्या निर्णयाची माहिती देण्यात आली.

अतुल बेनके यांच्या मते, या भूमिकेला सुनेत्रा पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. जुन्नरमधील प्रत्येक कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा विश्वास त्यांनी दिला. अजित दादांचे प्रतिबिंब त्यांच्या कार्यशैलीत दिसते, असे बेनके म्हणाले. अजित पवार जसे तालुक्याला पाठबळ देत होते, तसेच पाठबळ सुनेत्रा पवार देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी नेतृत्वाने दिलेला हा संदेश महत्त्वाचा मानला जात आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या वेळी मतांची विभागणी होऊ नये, म्हणून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र लढण्याचा निर्णय घेतल्याचे बेनके यांनी स्पष्ट केले. फक्त घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवण्याचे ठरले होते. दोन पक्षांतील मतांची फूट आम्हाला परवडणारी नव्हती, असे ते म्हणाले. निवडून आलेल्या सदस्यांसह त्यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. या भेटीत घड्याळ आणि तुतारी या दोन्ही बाजूंचे तालुकाध्यक्ष उपस्थित होते, अशी माहितीही त्यांनी दिली.

या चर्चेत पुढील वाटचालीवरही चर्चा झाली. दादा नाहीत, मग पुढे काय? असा प्रश्न कार्यकर्त्यांमध्ये उपस्थित झाला होता. त्यावर एकत्र राहून काम करणे हाच योग्य मार्ग असल्याचे ठरवण्यात आले. राज्यात औपचारिक विलिनीकरण होईल की नाही, हे वेगळे; मात्र जुन्नरमध्ये संयुक्त पद्धतीने काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. स्थानिक नेतृत्वाने घेतलेला हा निर्णय कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा ठरला आहे.

राज्यभरात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत चर्चांचा जोर वाढत असताना जुन्नरचा हा प्रयोग लक्षवेधी ठरला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर मतांची विभागणी टाळून एकत्र काम केल्यास राजकीय परिणाम कसे बदलू शकतात, याची चुणूक येथे दिसली. आता या प्रयोगाचे परिणाम काय होतात आणि इतर तालुक्यांतही अशीच भूमिका घेतली जाते का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## संभाजीनगरात भाजपमध्ये स्वीकृतसाठी नेत्यांच्या पुत्रांना नो




**छत्रपती संभाजीनगर :** महापालिका निवडणुकीत ५७ जागांसह घवघवीत यश मिळवल्यानंतर आता भाजपमध्ये स्वीकृत सदस्यपदासाठी रस्सीखेच सुरू झाली आहे. मात्र, निवडणुकीच्या वेळी अवलंबलेले नीतिनिर्देश भाजप आता स्वीकृत सदस्य नियुक्तीतही कायम ठेवणार असल्याचे संकेत मिळत आहेत. परिणामी मंत्री, खासदार आणि आमदारांच्या मुलांसह त्यांच्या आप्तस्वकीयांना पुन्हा एकदा डावलले जाण्याची शक्यता निर्माण झाली असून, राजकीय वर्तुळात या निर्णयाची जोरदार चर्चा रंगली आहे.

भाजपच्या धोरणानुसार, ज्या नेत्यांना आधीच पदे किंवा तिकिटे मिळाली आहेत, त्यांच्या कुटुंबात पुन्हा सत्ता देण्यास कार्यकर्त्यांचा विरोध आहे. "पक्षासाठी सतरंज्या उचलणाऱ्या कार्यकर्त्याला पद मिळणार की केवळ मोठ्या नेत्याचा मुलगा म्हणून संधी मिळणार?" हा कळीचा प्रश्न सध्या भाजपच्या व्हॉट्सॲप ग्रुप्सवर फिरत आहे. त्यामुळेच श्रेष्ठींनी सावध पवित्रा घेत नेत्यांच्या वारसांना दूर ठेवण्याचे संकेत दिले

भाजपच्या गोटातून मिळालेल्या माहितीनुसार, १५० पेक्षा जास्त अर्जांमधून निवड करणे ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून ते एक मोठे राजकीय संकट ठरू शकते. निवडणुकीच्या वेळी ज्या २३ बंडखोरांना "स्वीकृत'चे गाजर दाखवून शांत करण्यात आले होते, ते आता आक्रमक झाले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, पक्षात असा विचार सुरू आहे की, पाच सदस्यांपैकी काही सदस्यांचा कार्यकाळ अडीच वर्षांचा ठेवायचा, जेणेकरून जास्तीत जास्त निष्ठावंतांना संधी देता येईल. एकाला पूर्ण पाच वर्षे देण्याऐवजी फिरते पद हा फॉर्म्युला बंडखोरी रोखण्यासाठी इनसाइड गेम ठरू शकतो.

## मंत्री झिरवाळांच्या कार्यालयातील लाचखोरीमागे भाजप

**मुंबई :** सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाचखोरीच्या प्रकरणामागे भाजपचा हात असल्याचा संशय काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केला आहे. महायुती सरकार टक्केवारीचे आहे. त्यामुळे नरहरी झिरवाळ यांना बदनाम करण्यासाठी भाजपनेच रचलेले हे कुभांड असू शकते, असे त्यांनी म्हटले आहे.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिक राजेंद्र ढेरंगे यांना ५० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने अटक केली आहे. चक्क मंत्रालयात लाचखोरीची ही घटना घडल्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. मंत्री झिरवाळ यांनी या प्रकरणाशी आपला संबंध आढळला तर आपण तत्काळ राजीनामा देऊ अशी भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी या प्रकरणावर संशय व्यक्त केला आहे.

नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील क्लार्कला लाच घेताना पकडणे, हे भाजपचे राजकीय षडयंत्र असू शकते. विरोधकांना आणि मित्रपक्षांना बदनाम करण्यासाठी सरकारी यंत्रणांचा वापर करणे हा यांचा जुना धंदा आहे. स्वतः 'टक्केवारी' च्या चिखलात रुतलेल्या सरकारने दुसऱ्यावर चिखलफेक करू नये. हे टक्केवारीचे सरकार आहे. आता मंत्रालयातही या गोष्टी चालू झाल्या आहेत. कोणत्याही कार्यालयात जा टक्केवारीचा हिशोब आहे. आता ते उघड झाले आहे. प्रत्येक मंत्र्याच्या कार्यालयात उघडपणे टक्केवारी मागितली जाते, असे ठाकूर यांनी म्हटले आहे.

यशोमती ठाकूर यांनी यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवरही टीका केली. सध्या शेतकऱ्यांचे हाल सुरू आहेत. त्यांच्या मालाला भाव नाही. टॅरिफच्या मुद्यावर केंद्र सरकार तोंड उघडायला तयार नाही. सरकारचा प्रत्येक निर्णय हा बळीराजाच्या विरोधात येत आहे. भाजपने देश अमेरिकेला विकला आहे. पंतप्रधान मोदी स्वतःला विश्वगुरू समजतात, पण साधी पत्रकार परिषद ते घेऊ शकत नाहीत. ते महिलांच्या मागे लपण्याचा प्रयत्न करत आहेत, असे त्या म्हणाल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ फेब्रुवारी २०२६


## गोगलगाय

गोगलगाय गोगलगाय
किती तुझा थाट
बुळबुळीत द्रव सोडून
चमचम करते वाट

डोक्यावरील दोन शिंगे
दिसतात किती मजेदार
कधी लहान कधी मोठी
गंमत वाटते फार

नाजूक शरीरावर
शंखाचा असतो भार
हळूहळू चालून
रस्ता करते पार

सतत चालतेस
जात नाही थकून
धोक्याची चाहूल लागता
बसतेस शंखात लपून

पाऊस थांबला की
दिसतेस तू येताजाता
लावते का ध्यान
उन्हाळा सुरू होता

देवबाप्पाने तुला
दिले नाही पाय
पुढे पुढे सरकते
सांग कशी काय?

**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. ९०११५५९१०६

## जगण्याचे सूत्र

क्षणाक्षणाने सरून जाते
आयुष्यात मिळालेला वेळ
जगता जगता बसत नाही
जीवनात जगण्याचा मेळ. १

बालपणाचा अल्लड चाळा
तरुणपणात चढतो गर्व
जगता जगता कळून येते
जगायचे राहून गेले सर्व. २

बालपण खेळतांना जातो
तरुणपणात प्रेमाचा मेळ
वार्धक्यात कळाया लागते
संपताना जगण्याचा खेळ. ३

कमवून कमवून दमून गेला
सरत्या शेवटी गुज कळाले
कोणासाठी खटाटोप केला
वार्धक्यात सारे दूर पळाले. ४

माझे माझे म्हणता म्हणता
हाती लागत नाही काही
जीवनाचा हा खेळ निराळा
वर घेऊन जाता येत नाही. ५

कमावलेले धन सारे नश्वर
वाटून घेती आपलेच पुत्र
इथे कळाले नाही जगतांना
कोणालाही जगण्याचे सूत्र. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## तुझ्या मिठीत

तुझ्या मिठीत मला जगण्याची ओढ मिळाली,
कोरड्या श्वासाला प्रेमाची गोड बरसात आली.

तुझ्या स्पर्शातून विश्वासाची सौगात आली,
अंधाऱ्या वाटेला उजेडाची नवी पहाट आली.

नजरानजर झाली, मनात गोड नाद उमटला,
हृदयाच्या मंदिरात नाजूक स्वरांची लाज आली.

सावलीसारखी सोबत राहशील तू म्हणाली,
भीतीच्या मनावर धैर्याची ज्योत आली.

हातात हात देता जग सारं विसरून गेलो,
मायेच्या सावलीत मनाला गोड साज आली.

चांदण्यांच्या शिंपणाने देहात सुगंध फुलला,
रोमांचाच्या सुरात मधुरशी रात आली.

कटाक्ष तुझा जणू हृदयाला धार मिळाली,
नजरेच्या जादूने आत्म्याला मुक्तीची आस आली.

तुझं प्रेम औषध, तुझी नजर मरहम झाली,
जखमी श्वासाला नवजीवनाची नवी श्वास आली.

तुच माझी हिम्मत, तुच माझा आधार झालीस,
तुझ्या मिठीत हरवून जगण्याची नवी वाट आली.

त्या मिठीत हरवून रूह माझी मुक्त झाली,
त्या क्षणी जगाला विसरून मधुर आठवण आली.

तुझ्या नावाचीच धून ओठांवर सतत आली,
माझ्या जगण्याला इश्काची नवी दिशा आली.

तुझ्या मिठीत हरवून लेखणीला धून आली,
शब्दांच्या प्रत्येक श्वासात प्रेमाची बरसात आली.

**प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

# जातीअंताची लढाई माईसाहेबांनी स्वत:पासूनच सुरू केली - प्रकाश त्रिभुवन




**छत्रपती संभाजीनगर :** माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर यांच्या 117 व्या जयंतीनिमित्त आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या केल केलेल्या नवविवाहितांचा सत्कार करण्यात आला. नाट्य व चित्रपट लेखक दिग्दर्शक प्रकाश त्रिभुवन हे याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ते पुढे म्हणाले की बाबासाहेब आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर यांनी आंतरजातीय विवाह करून जगासमोर नवा आदर्श उभा केला. माईसाहेब आंबेडकरांच्या आठ भावंडांपैकी सहा भावंडांनी आंतरजातीय विवाह केला होता. आंतरजातीय विवाह जातीअंतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे म्हणूनबाबासाहेब आणि माईसाहेब यांचा विवाह एक आदर्श विवाह होय. याप्रसंगी आंतरजातीय आंतरधर्मीय विवाह केलेल्या नवविहायतांचा सत्कार करण्यात आला. विजय सुरवाडे आणि प्रकाश त्रिभुवन यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रकाश त्रिभुवन यांनी माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर या चित्रपटासंबंधी सविस्तर माहिती सांगितली कार्यक्रमामध्ये विजय सुरवाडे यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी इकरा पब्लिक स्कूलचा 'घर घर दस्तक' उपक्रम; शिक्षकांनी घेतली पालकांची भेट



**जळगाव :** दहावीच्या बोर्ड परीक्षा आता अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत, या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची तयारी कशी सुरू आहे आणि त्यांना अभ्यासात कोणत्या अडचणी येत आहेत,याचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी इकरा पब्लिक स्कूलने 'घर-घर दस्तक' ही अभिनव मोहीम राबवली आहे.या उपक्रमांतर्गत शाळेतील शिक्षक स्वतः विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांच्या अभ्यासाची बारकाईने पाहणी करत असून विद्यार्थी खरोखर मनापासून अभ्यास करत आहेत का,त्यांचे वेळापत्रक कसे आहे आणि त्यांना कोणत्या विषयांत विशेष मदतीची गरज आहे, हे शिक्षक प्रत्यक्ष भेटीतून समजून घेत आहेत.परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांवरील ताण कमी करून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असून शिक्षकांनी केवळ विद्यार्थ्यांशीच नव्हे,तर त्यांच्या पालकांशीही सविस्तर चर्चा केली आहे."घरात अभ्यासासाठी पोषक वातावरण कसे असावे, मोबाईलचा वापर कसा टाळावा आणि मुलांच्या आहाराकडे कसे लक्ष द्यावे," याबद्दल शिक्षकांनी पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले असून पालकांनी देखील शाळेच्या या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले आहे. शाळेने केवळ वर्गापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत पोहोचून घेतलेली ही दखल खरोखरच कौतुकास्पद असून,या मोहिमेमुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी वाढली आहे व बोर्ड परीक्षेत शाळेचा निकाल उत्तम लागेल, असा विश्वास मुख्याध्यापक शेख शकील आणि शिक्षकांनी व्यक्त केला असून स्थानिक नागरिक आणि शिक्षण क्षेत्रातून या मोहिमेवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ फेब्रुवारी २०२६

## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेची निसर्ग सहल, कृषी पर्यटन केंद्राला भेट




**छत्रपती संभाजीनगर :** माननीय श्री जी श्रीकांत साहेबांच्या बेस्ट स्कूल टू स्मार्ट स्कूल शाळेअंतर्गत मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेची निसर्ग सहल व कृषी पर्यटन दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली होती. या सहलीमध्ये शाळेतील शिक्षक वृंद व विद्यार्थी यांची निसर्ग सहल देवगड येथे नेण्यात आली होती. तसेच निसर्गाचे संवर्धन, आपल्या आयुष्यात झाडांचे महत्त्व,निसर्ग संपन्न वातावरण या अशा अनेक गोष्टींचा परिपोष करण्यासाठी अहिल्या नगर जिल्ह्यातील साईबन कृषी पर्यटन केंद्रास भेट देण्यात आली. या भेटीत विद्यार्थ्यांनी विविध झाडांची ओळख, त्यांचे महत्त्व,वृक्षारोपण, फुलपाखरांचे सानिध्य,फुलांचे उद्यान,, विविध पक्षी, रंग चित्र, अंतरिक्ष यात्रा कळसुत्री भावल्यांचे खेळ, रोपवे,बोटिंग झुलता पु ल जम्पिंग जपाक,रेन डान्स, असे विविध चित्तथरारक खेळ आणि मनोरंजक खेळ यांचा आस्वाद घेतला. वनभोजनाने आणि हुरडा पार्टीने कार्यक्रमाचा आनंद द्विगुणीत झाला. पर्यावरणाच्या सानिध्यात घालवलेला हा दिवस खरच अविस्मरणीय ठरला. या शैक्षणिक सहलीच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक पी. पी शिंदे सर, राठोड सर,वाघ सर, पठाण सर, चव्हाण सर, श्रीमती भारद्वाज मॅडम, शिंदे मॅडम, भिंगोले मॅडम, सासवडे मॅडम, यांनी अथक परिश्रम घेतले. शैक्षणिक सहलीचा प्रवास लालपरी च्या साह्याने सुखकर झाला.

## झाड

झाड पडलं पडलं
झाड तोडलं तोडलं
मुक्या त्याच्या वेदनांना
नाही दिला कोणी सूर..

उनपाऊस झेलून
झाड तरलं तरलं
जगा सावली देण्याचं
व्रत पहा त्याचं थोर..

रोज तुफान वाऱ्याशी
दोन हात करणारं
माळरानी ओसाडात
नंदनवन फुलविणारं..

झाड तोडून पडलं
त्याच्या पाहून वेदना
भग्न वाऱ्याचं रुदन
साऱ्या शिवारी घुमलं..

अरे माणसा माणसा
काय तू हे केलं पाप
तोडून एक एक झाड
झाला शापित राक्षस..

अरे तुझ्या जगण्याला
अन मेल्यावरी सरणाला
त्याच्याविना कधी
अर्थ नव्हता नव्हता..

त्या झाडास तोडुनी
अरे पुढच्या पिढीला
अरे काय मरणाचा
दिला तू वारसा...



**ज्ञानेश्वर गायके, कन्नड**
मो..9403384889

## असा होता माझा बाप....



बाप वंशाचा दिवा
आईचा नवसाचा ठेवा
बहिणींचा पाठीराखा
सगळ्यांचा तो सखा

नाव घेताच उभा राहे मान
शब्दांत न मावे सन्मान
घराघरांत माणसांच्या मनी
स्वभावाने होते महागुणी

सग्या सोयरांत गणी
शंभर एकरांचा धनी
काय सांगू त्यांचे ऋण
गणितात शंभर गुण

बाप नव्हे मित्र खरा
नात्यात होती एक धरा
नाते नव्हे मनातली मूर्त
संस्कारांच होत गोत्र

जावयी त्यांचे मानी
केदारनाथला माने सदगुणी
ज्योती, बद्रिनाथ अभिमान
घरातच होते चारधार

सुना त्यांच्या खानदानी
चांगुणाबाई अर्धांगिनी
नातवंड विश्वात सदा मग्न
संस्कारातून शिकविले जगणं

हट्ट धरीला मनी
उमगलच नाही कोणी
क्षणात गेले डोळे मिटूनी
सगळे पाहिले मी जवळूनी

त्या क्षणी हरपल जगणं
छत्र गेले डोक्या वरन
आभाळ कोसळल मनावर
आवाज अडकला श्वासावर

असा होता माझा बाप.....

**- ज्योती शिवाजी निळ(थोरात)**

## प्राणिशास्त्र विभागाच्या वस्तुसंग्रहालयातील विविध प्राणी, पक्षी यांच्या अवशेषांची चोरी



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या वस्तुसंग्रहालयातील विविध प्राणी, पक्षी यांच्या अवशेषांची चोरी करून त्याचा वापर जादूटोणा, अंधश्रद्धा यासाठी वापर होत असल्याचा आरोप सचिन निकम, राहुल वडमारे यांनी केला असून विविध मागण्याचे निवेदन त्यांनी कुलगुरू डॉ.विजय फुलारी यांना दिले आहे.संग्रहालयात प्रामुख्याने घुबड या वन्यजीव कायद्या अंतर्गत संरक्षित पक्षाच्या अवशेषांमधील नखे, पिसे व अवयव काढून घेण्यात आल्याची गंभीर बाब त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली असूनया निवेदनात प्राणिशास्त्र विभागात विविध प्राणी, पक्षी यांचे अवशेष, हाडे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जतन करून ठेवण्यात आली असून यातील काही प्राणी पक्षी यांचे विविध अवयव हे मौल्यवान असल्याने त्याची काळ्या बाजारात मोठी किंमत असल्याने जादूटोण्यासारख्या अंधश्रद्धेच्या कामात याचा गैरवापर होऊ शकतो म्हणून वस्तुसंग्रहालयाची सुरक्षा तोकडी असल्याचा आरोप केला आहे. प्राणिशास्त्र विभागाच्या तसेच वस्तुसंग्रहालयातील बहुतांश कपाटांना टाळे नाही, पुरेशी स्वच्छता व सुरक्षा व्यवस्था नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.प्रामुख्याने घुबड या पक्षाची नखे, पिसे हे अवयव गायब असून ही घटना केवळ चोरी किंवा निष्काळजीपणाचा प्रकार नसून, वन्यजीव तस्करी, काळा बाजार, अंधश्रद्धा-आधारित जादू टोणा यांसारख्या घृणास्पद आणि गुन्हेगारी प्रवृत्तीशी संबंधित असण्याची शक्यता वर्तवली आहे.विद्यापीठासारख्या शैक्षणिक आणि पुरोगामी संस्थेत, असा प्रकार घडणे हे अत्यंत अशोभनीय, लाजिरवाणे असल्याने याबाबत तात्काळ कारवाई करावी अशी मागणी करूनरिपब्लिकन विद्यार्थी सेनेच्या वतीने पुढील प्रमाणे मागण्या केल्या आहेत1) या घटनेची तात्काळ स्वतंत्र चौकशी समिती नेमावी.2) वस्तुसंग्रहालयातील सर्व जतन नमुन्यांची पूर्ण पडताळणी (Inventory Audit) करून अहवाल जाहीर करावा.3) सीसीटीव्ही फुटेज, प्रवेश नोंदी, सुरक्षा कर्मचारी, विभागातील जबाबदार अधिकारी यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी.4) ही घटना वन्यजीव तस्करी / चोरी या स्वरूपाची असल्याने, संबंधित पोलीस स्टेशनमध्ये तात्काळ गुन्हा दाखल करावा.5) भविष्यात असे प्रकार होऊ नयेत यासाठी वस्तुसंग्रहालयात सुरक्षा व्यवस्था, सीसीटीव्ही, डिजिटल रेकॉर्ड, लॉक-सील व्यवस्था अधिक मजबूत करावी.विद्यापीठाने अधिकृतपणे अंधश्रद्धा विरोधी भूमिका स्पष्ट करून, या घटनेबाबत पारदर्शक माहिती प्रसिद्धीस द्यावी व सर्व संबंधित दोषींवर कारवाई करावी अशी मागणी सचिन निकम, राहुल वडमारे यांनी केली आहे.

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ फेब्रुवारी २०२६

## ग्रामीण भागात उद्योजक घडावेत यासाठी पशुपालनाला कृषी चा दर्जा - पंकजा मुंडे



**बीड (भगवंत पाळवदे) :** पशुपालनास कृषीचा दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. यामुळे कृषी च्या दराने कर्ज पुरवठा करण्यासोबत पशु पालनासाठी ५० टक्के अनुदान देखील दिले जाणार आहे त्यामुळे या क्षेत्रात मोठया प्रमाणात ग्रामीण उद्योजक तयार होतील आणि यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन पशु संवर्धन तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी परळी येथील भव्य अशा महा पशुधन एक्सपो २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी केले. परळी येथील अंबाजोगाई मार्गालगत असणा-या ओपळे मैदान येथे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. भव्य अशा ३८ एकर मैदानात होणारे हे प्रदर्शन १५ फेब्रुवारी पर्यंत चालणार आहे.उद्घाटन प्रसंगी परळीचे आमदार धनंजय मुंडे, पशुसंवर्धन सचिव डॉ. एन. रामा स्वामी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पशुसंवर्धन आयुक्त प्रविण देवरे तसेच परळीच्या नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती.आरंभी प्रदर्शन स्थळी फित कापून व गौपूजन करुन सुरुवात झाली त्यानंतर औपचारिक उद्घाटन सोहळा दीप प्रज्ज्वलन करुन पार पडला यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन तसेच स्व. गोपीनाथ मुंडे आणि स्व. अजित पवार यांना अभिवादन करण्यात आले. पशुपालन हा व्यवसाय उद्योगात रुपांतरित व्हावा यासाठी शासन पुढाकार घेत आहे. या खात्याचा कार्यभार स्विकारल्यावर स्व. अजित पवार यांच्या पुढाकाराने बारामतीसोबत परळी येथील पशु महाविद्यालय आपण मंजूर करुन घेतले. आजचे हे भव्य प्रदर्शन पाहून स्व. अजित पवार आज असते तर त्यानांही आयोजन आवडले असते असे पंकजा मुंडे म्हणाल्या. देशभरातुन पशू या प्रदर्शनासाठी देशातील विविध भागातील पशुधन येथे आणले आहे. या ठिकाणी देशातली सर्वात छोटी गाय तसेच विविध प्रजातींच्या गायी, बैल, घोडे आणि बकरे यांच्यासह विविध पक्षी विस्तीर्ण दालनांमध्ये ठेवण्यात आले आहेत. या ठिकाणी स्व. अजित पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ एक स्वतंत्र दालन देखल उभारण्यात आले आहे. पशुपालन तंत्रात आलेले नवे बदल तेसच उत्पादकता वाढवणारी आणि पशुंवर उपचार करणारी औषधे या ठिकाणी उपलब्ध आहेत. या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची मार्गदर्शपर व्याख्याने स्वतंत्रपणे होत आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या प्रदर्शनाची पाहणी करण्यासाठी येत आहे. त्याचेही नियोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर मंत्री पंकजा मुंडे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.






# सहा गटासह गणातील १४ जागांवर प्रथमच कमळ फुलले



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दहा व पंचायत समितीच्या २० जागांचा निकाल जाहीर झाला यात राज्यमंत्री तथापि जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचे 'होम पीच' असलेल्या जिंतूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या सहा आणि पंचायत चौदा जागांवर विजय मिळवून जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजपचे प्रथमच कमळ फुलले. राष्ट्रवादी काँग्रेसला जिल्हा परिषदेच्या चार जागांवर मानावे लागले.काही ठिकाणी प्रस्थापितांना धक्का बसला. पालकमंत्री मेघना बोर्डीकर, जेष्ठ नेते माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षातर्फे हि निवडणुक लढवण्यात आली.तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने माजी आमदार विजय भांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुक लढवली. दोन्ही पक्षात अखेरपर्यंत चुरशीची लढाई झाली. यामध्ये वझर बु.गटात नवख्या उमेदवार भाजपच्या रोहिणी ज्ञानेश्वर वटाणे यांनी ७८५८ मते घेऊन राष्ट्रवादीचेमाजी सदस्य बाळासाहेब घुगे यांचा अवघ्या ६० मतांनी पराभव केला. घुगे यांना ७७९८ मते पडली. वाघी धानोरा गटात जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षाचे पती व राष्ट्रवादीचे उमेदवार विश्वनाथ राठोड यांचा भाजपचे नवखे उमेदवार रोहित नामदेव चव्हाण यांनी ६८७ मतांनी पराभूत केले. रोहित यांना ६९३८ तर राठोड यांना ६२५१ मते मिळाली.सावंगी-म्हाळसा गटात महिलांच्या पंचरंगी लढतीत भाजपच्या लता विजयकुमार वाकळे यांनी त्यांच्या नजीकच्या प्रतिस्पर्धी अनिता उबाळे यांचा तब्बल १,४६० मतांनी पराभव केला. वाकळे यांना ७३४५ तर उबाळे यांना ५८८५ मिळाली.आडगाव-बाजार : भाजपचे विजयी उमेदवार डॉ. देवराव गंगाधरराव कऱ्हाळे यांच्या पारड्यात ८२३६, प्रतिस्पर्धी भा.रा. काँग्रेसचे माधव रंगनाथ घोगरे यांना ४५१७ मते पडली. येथे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सखाराम जवादे तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेले.भोगाव गटात अपेक्षेप्रमाणे राष्ट्रवादीचे कृष्णाकांत शिवाजीराव मोरे देशमुख विजयी झाले.त्यांना ८२९१ आणि प्रतिस्पर्धी भाजपचे रवी बाबाराव मोरे देशमुख यांना ६३४३ मते मिळाली. वरुड दोन महिलांच्या सरळ लढतीत भाजपच्या संगिता राजेंद्र थिटे यांनी प्रतिस्पर्धी राष्ट्रवादीच्या संगिता विजय खिस्ते यांचा १४३४ मतांनी पराभव केला. थिटे यांना ७५४६ आणि खिस्ते यांना ६११२ मते मिळाली. याप्रमाणेच वस्सा गटात भाजपच्या मनिषा अभिजित पारवे विजयी झाल्या. तर चारठाणा, बोरी, कौसडी गटात राष्ट्रवादीच्या अनुक्रमे सरुबाई शंकर जाधव, दिपाली अजय चौधरी वमाणिक शेषराव हरकळ विजयी झाले. #चारठाणा गटात जिल्हा परिषदेच्या माजी सभापती यावेळी भाजपच्या उमेदवार मीनाताई नानासाहेब राऊत यांना मतदारांनी नाकारल्याने त्या तिसऱ्या क्रमांकावर फेकल्या गेल्या. #कौसडी गटात जिल्हा परिषदेच्या माजी सदस्याचे पती प्रभाकर रोहिनकर यांनाही पराभवाला सामोरे जावे लागले. **'एक नारी, सबको भारी' : जिल्ह्यातीलजिल्हा परिषद, बहुतांश पंचायत समित्या आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय काँग्रेसच्या सत्तेखाली होत्या यावेळीजिल्ह्याच्या पालकमंत्री भाजपचे कमळ फुलवण्यासाठी सर्व टिमसह स्वत: प्रचारात उतरून मतदारसंघातील जिंतूर, सेलू तालुक्यात अनेक ठिकाणी सभा घेतल्या, ठिकठिकाणी बैठका घेतल्या. परिणामस्वरूपी जिंतूर व सेलू तालुक्यातील अनुक्रमे सहा, व पाच गट आणि दोन्ही तालुक्यातील मिळून २२ गणात भाजपचे 'कमळ' भुलविले. यावरून 'एक नारी, सबको भारी' चा प्रत्यय दिसून येतो.

# परभणीत बालसाहित्य संमेलनात इंग्रजी लेखन सराव पुस्तिकेचे प्रकाशन




**परभणी :** येथे आयोजित तिसऱ्या अक्षर आनंद बालवाचक साहित्य संमेलन मध्ये श्री. विठ्ठल अनमुलवाड लिखित Complete English Word Writing Practice Booklet या इंग्रजी लेखन सराव पुस्तिकेचे प्रकाशन उत्साहात करण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष होते इंद्र मणी (कुलगुरू, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी), तर प्रमुख पाहुणे होते कांतराव देशमुख, माणिक पुरी, विनोद शेंडगे आणि मारोती डोईफोडे. संमेलनाध्यक्ष कु. कोमल अर्जुन डाखोरे व स्वागताध्यक्ष कु. अनन्या आत्माराम खवले यांच्या हस्ते पुस्तिकेचे अनावरण झाले.मान्यवरांनी बालवाचन आणि इंग्रजी लेखन कौशल्यवर्धनाचे महत्त्व सांगितले आणि विद्यार्थ्यांनी अशा शैक्षणिक साहित्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास शिक्षक, पालक, विद्यार्थी व बालसाहित्य प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १४ फेब्रुवारी २०२६


## अजितदादांच्या निधनानंतर अशा लिखाणाचा हेतू काय? शशिकांत शिंदेंच्या लेखावर सुनील तटकरेंकडून आक्षेप



**मुंबई :** दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेवरून राजकारण तापले असताना, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "विलीनीकरणाबाबत कोणताही प्रस्ताव किंवा विचार समोर आला, तर त्यावर पक्षपातळीवर चर्चा होईल. मात्र, आम्ही एनडीएचा घटक पक्ष असल्याने कोणताही मोठा निर्णय घेताना भाजपला विश्वासात घेणे अनिवार्य आहे," असे तटकरे यांनी ठणकावून सांगितले. दरम्यान, शरद पवार गटाचे नेते शशिकांत शिंदे यांनी अजित पवारांच्या भूमिकेबाबत केलेल्या दाव्याचाही त्यांनी तीव्र शब्दांत निषेध केला.

विलीनीकरणाच्या संदर्भात पत्रकारांशी बोलताना सुनील तटकरे म्हणाले की, "जेव्हा एखादी चर्चा सुरू होईल, तेव्हा सुनेत्रा पवार आणि पक्षाचे वरिष्ठ नेते त्यावर विचार करतील. मात्र, आज एनडीएचा मुख्य पक्ष भाजप आहे. आम्ही २०२३ मध्ये जेव्हा एनडीएत सहभागी झालो, तेव्हा भाजपने आम्हाला अनुमती दिली होती. त्यामुळे भविष्यातही अशा प्रकारच्या मोठ्या निर्णयावेळी आघाडीतील मुख्य पक्षाशी चर्चा करावीच लागेल."

शशिकांत शिंदे यांनी पक्षाच्या मुखपत्रात दावा केला होता की, अदृश्य शक्तीच्या कारवाया, धमक्या व खोटे नाटे षडयंत्र करून केलेले आरोपांमुळे अजितदादांना राष्ट्रीवादीतून बाहेर पडून, वेगळा गट स्थापन करावा लागला होता. याची आपल्याला कल्पना व जाणीव आहे. पण झालेली चूक पुन्हा दुरुस्त करायची, अशा विचाराने दादा मागील चार पाच महिन्यांपासून कामाला लागले होते. यावर संताप व्यक्त करत सुनील तटकरे म्हणाले, "शिंदेंनी केलेले विधान अत्यंत गैर आहे. अजितदादांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर अशा प्रकारचे लिखाण करणे अनाठायी आहे. दादांनी घेतलेले निर्णय हे स्वच्छ मनाने आणि पक्षाच्या हितासाठीच होते. आता असे लिहून ते नेमके काय साध्य करू पाहत आहेत? त्यांचा हेतू काय? हे मला कळू शकले नाही."

यापुढे जर काय ते अशा आरोपांमुळे दादांनी हा निर्णय घेतला असं जर काही बोलत राहतील, तर योग्य पद्धतीने त्यांना उत्तर राष्ट्रवादीचा अध्यक्ष म्हणून सुनील तटकरे देईल, असा गर्भित इशारा सुनील तटरकेंनी शशिकांत शिंदे यांना दिला.

"भाजपसोबत जाण्याची अजितदादांची भूमिका नवीन नव्हती," असा पुनरुच्चार तटकरे यांनी केला. २०१४, २०१६ आणि २०१७ मध्येही चर्चा अंतिम टप्प्यात आली होती. २०१९ मध्येही दादांनी स्पष्टपणे सांगितले होते की, भाजप आणि राष्ट्रवादीचे सरकार राज्याला स्थिरता देऊ शकते. त्यांनी आपली ही इच्छा कधीही लपवून ठेवली नव्हती, असेही सुनील तटकरे यांनी नमूद केले.

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची घोषणा १२ फेब्रुवारी रोजी होणार होती, अशी माहिती शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली होती. घोषणेच्या तारखेच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे आज १३ फेब्रुवारी रोजी शशिकांत शिंदेंचा लेख समोर आला आहे. यावर सुनील तटकरे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मासिक दर महिन्याला प्रकाशित होत असते. हे मासिक पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात प्रकाशित होत असते. आता ती तारीख योगायोग म्हणून आहे की, मुद्दामहून १२ तारखेनंतर १३ तारखेला लिहायचे? याबद्दल मला बोलायचे नाही. माझे त्याबद्दल काही मत नाहीये.

या लेखाचं शीर्षक आहे की 'भावपूर्ण निरोप अजित दादांना' याचा अर्थ दादांच्या अपघाती निधनानंतरचा तो लेख आहे. दादांबद्दल जे लिहिलेलं आहे त्याला माझा मात्र तीव्र आक्षेप आहे, असे सुनील तटकरेंनी सांगितले.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी एकत्र यावे, अशी इच्छा पक्षातील सुमारे 35 आमदारांची असल्याचे वक्तव्य राष्ट्रवादीचे नेते हिरामण खोसकर यांनी केले होते. त्यांच्या या विधानावर सुनील तटकरे यांनी थेट समर्थन किंवा विरोध न दर्शवता सावध भूमिका घेतली. ते म्हणाले की, "मी हिरामण खोसकर यांच्याशी याबाबत नक्कीच बोलेन. ते आमचे वरिष्ठ सहकारी आहेत. त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या असतील. त्या संदर्भात आम्ही बसून चर्चा करू," असे म्हणत तटकरेंनी या विषयावर अधिक भाष्य करण्याचे टाळले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## कोणत्याही देवाचे मंदिर नको, मला बालक मंदिर पाहिजे

**बुलढाणा (महेश मुंढे) :** गावोगावी नवीन मंदिर उभारणीची स्पर्धा लागलेली दिसते, पण त्या मंदिराच्या सावलीत वाढणाऱ्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न मात्र कायम दुर्लक्षित राहतो - ही वस्तुस्थिती आपण किती दिवस नजरेआड करणार आहोत? श्रद्धा माहत्वाची आहे पण श्रद्धेच्या नावाखाली भविष्याकडे पाठ फिरवने ही ही समाजाची सर्वात मोठी चूक ठरु शकते.म्हणूनच आज किनगाव राजा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथून एक ठाम आणि अस्वस्थ करणारा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे " मला कोणत्याही देवाचे मंदिर नकोय, मला बालक मंदिर हवयं द्याल का? " ही भूमिका कोणत्याही धर्माविरोधात नाही तर समाजाच्या प्रधान्यक्रमावर बोट ठेवणारी आहे, आपण देवांनसाठी संगमरवरी गाभरे उभे करतो, सोन्याचे कळस चढवतो, पण गावातील बालकांसाठी दर्जेदार शिक्षणाची साधी व्यवस्था करण्यासाठी मात्र आपला हात आखाडता घेतो हे वास्तव लाजिरवाने नाहीका? देवाच्या नावाने मोठमोठे उस्थव साजरे केले जातात, निधी गोळा केला जातो पण बालकांसाठी सुरक्षित शिक्षणाच्या जागेची कमतरता मात्र कायम असते. सन २०२२-२३ मध्ये तत्कालीन ग्रामपंचायत प्रशासनाने अंगणवाडी च्या बांधकामचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले होते त्या नुसार अंगणवाडी च्या बांधकामासाठी दि. २८-०८-२०२५ रोजी जिल्हा नियोजन समिती मध्ये GP/२०२५ - २६-०४-२०२५ नुसार मंजूर झालेले असून प्रशासकीय मान्यता झाली आहे, परंतु गावातील काही लोकांनी ग्रामपंचायत प्रशासनाच्या मदतीने आगस्ट २०२५ मध्ये ग्रामपंचायत नमुना ८ ला क्रमांक १६२७ ला जि नोंद केली ती अधिकाराचा दुरुपयोग करून केली आहे.हे चुकीचे नाही का? हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.समाजाने स्वतःला आरश्यात पाहण्याची वेळ आली आहे, आपण खरोखर देवाची सेवा करत आहोत का? की फक्त परंपरेच्या नावाखाली स्वतःच्या समाधानाची भावना जोपसतोय? बालक मंदीर केवळ शाळा नाही ती समाजाच्या भविष्याची गुंतवणूक आहे, ज्या समाजाने मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले तो समाज प्रगत झाला आणि ज्यांनी अंधश्रद्धा आणि दिखाव्यावर भर दिला ते मागेच राहिलेत - इतिहास यांची साक्ष देतोय मग आपण कोणत्या मार्गांवर चालणार ? किनगाव राजा हे परंपरणे समृद्ध गाव आहे, पण परंपरेसोबत परिवर्तन स्वीकारण्याची हिम्मत दाखवली नाही तर विकासाची गती थांबेल. देवांची संख्या वाढवण्या पेक्षा ज्ञानाच्या मंदिराची संख्या वाढवणे अधिक गरजेचे आहे, कारण देवावर श्रद्धा ठेवणारे लोकं तयार करण्यासाठी ही आधी समाज शिक्षित असावा लागतो.आज गावातील ग्रामपंचायत च्या गलथान आणि सत्तेच्या दुरुपयोगाच्या केलेल्या मंदिराच्या प्रस्तावावर प्रत्येक नागरिकांने कठोर प्रश्न विचारायला पाहिजे, आपण मंदिरासाठी लाखो रुपये खर्च करू शकतो मग मुलांच्या भविष्यासाठी का नाही? देवाला फुले अर्पण करण्यापेक्षा मुलांना शिक्षण देणे हेच खरे पुण्य नाही का? आता भावनिक घोषणानी नाही तर ठोस ठोस निर्णयानी बदल घडवण्याची वेळ आली आहे, सामाजिक संघटना, युवा वर्ग आणि पालक यांनी एकत्र येऊन बालक मंदिर उभारण्याचा ठाम निर्धार केला पाहिजे. कारण हे कोणत्याही एका देवाचे मंदिर नसून संपूर्ण समाजाच्या उज्वल भविषचे मंदिर असेल. मंदिराची संख्या वाढवण्या ऐवजी ज्ञानाची क्रांती घडवूया " कोणत्याही देवाचे मंदिर नको, मला बालक मंदिर पाहिजे " हा नारा देवू या.

## प्रा. डॉ. योगीराज विजापुरे यांना पितृशोक



**उमरगा :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात कार्यरत असलेले रसायन शास्त्र विभागातील संशोधक प्रा.डॉ.योगीराज विजापुरे यांचे वडील श्री अशोक राजशेखर विजापुरे यांचे काल सायंकाळी सहा वाजता सोलापूर येथे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.ते मृत्युसमयी 80 वर्षाचे होते. महाविद्यालयाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.त्यांचा अंत्यविधी आज सोलापूर येथे सकाळी होणार असल्याचे त्यांच्या जवळच्या नातेवाईकांकडून कळवण्यात आले आहे.त्यांच्या अकाली निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.